नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २२/०४/२०२६ (बुधवार )**

---

# प्रतिबंधीत सुगंधित तंबाखुची विक्री करीता साठवणुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद, १४८.७२४ किलोग्रॅम प्रतिबंधीत तंबाखु एकुण ०२ लाख ४८ हजार ७५० रूपयांचा मुद्देमाल जप्त, उमरेड पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन उमरेड** :— दिनांक २१/०४/२०२६ रोजी उमरेड पोलीस पेट्रोलींग करीत असतांना गुप्त बातमीदारा मार्फत माहिती मिळाली की, उमरेड परिसरातील जीचकर हॉल जवळ, ईतवारी पेठ, उमरेड येथे जग्गु अरूण शाहू, रा. सोनेजरी नगर, उमरेड, जि. नागपूर याने आपले किराणा दुकान बालाजी ट्रेडर्स येथे महाराष्ट्रात प्रतिबंध असलेला सुगंधित तंबाखु विक्री करीता साठा करून ठेवला आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी अन्न सुरक्षा अधिकारी, अन्न व औषध प्रशासन नागपुर यांना माहीती देत त्यांच्या सोबत संयुक्त कारवाई करत जीचकर हॉल जवळ, ईतवारी पेठ, उमरेड येथे **आरोपी नामे जग्गु अरूण शाहू, वय ४० वर्ष, रा. सोनेजरी नगर, उमरेड, जि. नागपुर** याच्या मालकीच्या बालाजी ट्रेडर्स किराणा दुकानाची पंचासमक्ष झडती घेतली असता महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत असलेला सुंगधीत तंबाखु मिळुन आला. **पोलीसांनी घटनास्थळावरून पंचासमक्ष वेगवेगळया कंपनीचे प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखु पॅकेट एकुण वजन १४८.७२४ किलोग्रॅम किंमती २,४८,७५०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.**

नमुद आरोपीने सदर प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखु मानवी जिवीतास अपायकारक आहे. तसेच महाराष्ट्र शासनाने त्याचे उप्तादन, विक्री, साठा व वाहतुकीवर प्रतिबंध लावलेला आहे हे माहीती असतांना सुध्दा प्रतिबंधीत अन्नपदार्थाची विक्री करण्याच्या हेतुने साठा केला होता.

आरोपी **नामे जग्गु अरूण शाहू, वय ४० वर्ष, रा. सोनेजरी नगर, उमरेड, जि. नागपुर** याचेविरूद्ध पोस्टे उमरेड येथे कलम १२३, २१४, २२३(बी),२७४, २७५भारतीय न्याय संहीता सहकलम अन्न सुरक्षा आणि मानके अधि. २००६ अन्वये गुन्हा नोंद केला आहे. **आरोपीला अटक करण्यात आली आहे.**

## पोलीस ठाणे कळमेश्वर हद्दीतील मौजा गौंडखैरी पारधीबेडा शिवारात अवैधरित्या मोहाफुल गावठी हातभट्टीची दारू काढणाऱ्या आरोपींवर १० गुन्हे नोंद,
## ०५ लाख ८६ हजार ५०० रूपयांचा मुद्देमाल जप्त

**पोलीस स्टेशन कळमेश्वर :—** दिनांक २१/०४/२०२६ रोजी कळमेश्वर पोलीस स्टेशन हद्दीतील गौंडखैरी, पारधी बेडा येथे मोहाफुल सडवा वापरून मोहाफुल हातभट्टीची दारू काढल्या जात आहे अशा गुप्त बातमीदाराच्या खात्रीशीर बातमीवरून मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक,नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात आणि श्री सागर खर्डे, सहा पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी सावनेर उपविभाग यांच्या नेतृत्वात कळमेश्वर पोलीस आणि दंगा नियंत्रण पथक यांनी कारवाई करत मौजा गोंडखैरी पारधीबेडा शिवारात घटनास्थळावरील हातभट्टया नष्ट केल्या.

**आरोपी नामे १) नितेश गोपीचंद माळी, वय २९ वर्ष, रा. वार्ड क्र. ४, गोंडखैरी ता. कळमेश्वर , २) गोपीचंद पवार, वय २० वर्ष, रा. वार्ड क्र ४, गोंडखैरी , ३)आश्वीन रामकृष्ण मारवाडी, वय २५ वर्ष, रा. वार्ड क्र ४, गोंडखैरी आणि ४) भागवत तुळशीराम पवार, वय ७० वर्ष, रा. वार्ड क्र. ४, गोंडखैरी आणि ६ महीला आरोपी यांच्यावर कारवाई करत घटनास्थळावरून पंचासमक्ष १४६०० लिटर मोहाफुल सडवा आणि ३६० लिटर मोहाफुल गावठी दारू, प्लॅस्टीक आणि लोखंडी ड्रम आणि इतर असा एकुण ५,८६,५००/— रूपयांचा जप्त केला. नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला. नमुद १० आरोपींविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.**




कारवाई करणारे पोलीस पथक जप्त मुद्देमालासह





## अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या ०२ आरोपीतांविरूध्द एन.डी.पी.एस कायदयान्वये गुन्हा नोंद

दिनांक २०/०४/२०२६ रोजी **रामटेक पोलीस स्टेशन** अंतर्गत पोलीस पेट्रोलींग करीत असतांना **आरोपी संतोष अंकुश इंगळे, वय २८ वर्ष, रा. वार्ड नं. ०३, मनसर हा पंचायत समितीच्या बाजूला हा** सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ सिगारेटमध्ये भरून सेवन करतांना मिळुन आला. दिनांक २१/०४/२०२६ **रोजी पोलीस स्टेशन उमरेड** अंतर्गत डी मर्सा हॉटेलचे बाजूला पोलीस पेट्रोलींग करीत असतांना **आरोपी मोहम्मद इशताक अब्दुल जब्बार, वय ४६ वर्ष, रा. तिलकवाडा, पांढुरना, जि. छिंदवाडा, मध्यप्रदेश, ह. मु. इतवारपेठ टाकीजवळ उमरेड** हा सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. नमुद आरोपींवर कलम २७ एन.डी.पी.एस. कायदयान्वये प्रत्येकी १ असे ०२ गुन्हे नोंद करण्यात आले आहे.

## अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री करणाऱ्या तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध २२ गुन्हे नोंद

नागपुर ग्रामीण जिल्हयात दिनांक २१/०४/२०२६ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन **मोहाफुल दारू, मोहाफुल रसायन सडवा, देशी दारू, विदेशी दारू, तसेच इतर साहित्य असा एकुण ११,३३,०८०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.** महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये एकुण २२ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन भिवापूर** येथे आरोपी नामे दिंगाबर मोडकु मेश्राम, वय ६० वर्ष, भिवापुर याचे वर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन कोंढाळी** येथे आरोपी नामे अक्षय वरूडकर, रा. कोंढाळी याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन केळवद** येथे १) महिला आरोपी २) प्रविन मधुकरजी कचडे, वय ४२ वर्ष, रा. उमरी, ता. सावनेर याचेवर प्रत्येकी ०१ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन सावनेर** येथे आरोपी नामे १) रवि रमेश पोरंडवार, वय ४१ वर्षे,

रा. वाघोडा, सावनेर २) तुषार युवराज बलकी, वय ३० वर्ष, रा. रेमंड बोरगाव ता. सौंसर, जि. छिंदवाडा ३) महेंद्र बाबाराव खंडारे, वय ३८ वर्ष, रा. सतवामाता मंदीर, सावनेर याचेवर प्रत्येकी ०१ असे ०३ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन कळमेश्वर** येथे आरोपी क्र. १) नितेश गोपीचंद माळी, वय २९ वर्ष, रा. वार्ड क्र. ४, गोंडखैरी तह. कळमेश्वर २) गोपीचंद पवार, वय २० वर्ष, रा. वार्ड क्र ४, गोंडखैरी ३) आश्वीन रामकृष्ण मारवाडी, वय २५ वर्ष, रा. वार्ड क्र ४, गोंडखैरी ४) भागवत तुळशीराम पवार, वय ७० वर्ष, रा. वार्ड क्र. ४, गोंडखैरी ५) ०६ महिला आरोपी यांचेवर प्रत्येकी ०१ असे एकुण १० गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन खापा** येथे आरोपी क्र. १) शांताराम सिताराम सोनवाने, वय ५२ वर्ष, रा. टेकाडी २) आनंद भौडस कोरवा, वय ५७ वर्ष, रा.बडेगाव, ता. सावनेर, जि. नागपूर यांचेवर प्रत्येकी ०१ असे एकुण ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन बोरी** येथे महिला आरोपी हिचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन रामटेक** येथे आरोपी नामे वासु नारायण कठौते, वय ३० वर्ष, रा. वार्ड नं. ४, कांद्री माईन, मनसर याचे वर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन कुही** येथे आरोपी नामे निखील विजय वानखेडे, वय २४ वर्ष, रा. ह. मु. वार्ड क्र. २, कुही याचे वर ०१ गुन्हा नोंद, अशा २२ आरोपीतांवर महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये २२ गुन्हे दाखल केले आहे.

**नमुद कारवाईत एकुण १) ३३१ लिटर मोहाफुल गावठी दारू, २) १४६० लिटर मोहाफुल रसायन सडवा ३) ३४२० मिली देशी दारू, ३६० मिली विदेशी दारू, तसेच इतर साहित्य असा एकुण ११,३३,०८०/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला**

**मा. पोलीस अधिक्षक**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**
**यांच्या मान्यतेने**